
बलिदान झालेले हुतात्मे
बलिदान दि.९-९-१९४२
हुतात्म्याचे नाव
गाव
श्रीपती घार्गे
हरी खटावकर
दिगंबर खटावकर
वडगाव
सिधु
वडगाव
किसन बाळा
वडगाव
खाशाबा
वडगाव
श्रीरंग भाऊ
उंचीठाणे
रामचंद्र
वडगाव



॥ प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥
वडूज शिक्षण विकास मंडळाचे
हुतात्मा परशुराम विद्यालय, वडूज
हुतात्मा बलभिम हरी खटावकर
हुतात्मा बाळकृष्ण दिगंबर खटावकर
हुतात्मा आनंदा श्रीपती गायकवाड
हुतात्मा परशुराम श्रीपती घार्गे
हुतात्मा श्रीरंग भाऊ शिंदे
हुतात्मा रामचंद्र कृष्णा सुतार
हुतात्मा खाशाबा मारुती शिंदे
हुतात्मा सिधु भिवा पवार
हुतात्मा किसन बाळा भोसले
आओ बच्चो तुम्हें दिखाए। झाँकी वडूज नगरीकी।
इस मिट्टी से तिलक करो। ये धरती है बलिदान की ॥
वन्दे मातरम्...वन्दे मातरम्...
हुतात्मा का चौक देखो । यही चली थी गोलियाँ।
हम से पुछों किसने खेली । यहाँ खुन की होलियाँ॥
एक तरफ बंदुके दनदन । एक तरफ थी टोलियाँ।
मरने वाले बोल रहे थे । इन्कलाब की बोलियाँ॥
यहाँ लगा दी परशुरामने । बाजी अपनी जान की।
इस मिट्टी से तिलक करो । ये धरती है बलिदान की॥
वन्दे मातरम्...वन्दे मातरम्...


९ सप्टेंबर १९४२, आज ७८ वा हुतात्मा दिन
वडूज येथे घडलेल्या भारत छोडो चळवळीतील
महाराष्ट्रातील सर्वात मोठा रक्तरंजित इतिहास
छोडो भारत चळवळ
हुतात्मा स्मारक वडूज
तालुका-खटाव, जिल्हा-सातारा.
वडूज येथील मामलेदार कचेरीवर तिरंगा फडकविण्याच्या
हेतूने काढण्यात आलेल्या देशभक्त तरुणांच्या मोर्चावर
जुलमी इंग्रज सैन्याकडून गोळीबार करण्यात आला
हुतात्म्यांच्या स्मृतीस शतश: नमन
फेसबुक
सातारा

# हुतात्मा स्मारक वडूज
## तालुका-खटाव, जिल्हा-सातारा.

| हुतात्म्याचे नाव | जन्म | मृत्यू | गाव | तालुका |
|---|---|---|---|---|
| १ हुतात्मा बलभीम हरी खटावकर | १२-८-१९०० | ९-९-१९४२ | पुसेसावळी | खटाव |
| २ हुतात्मा बाळकृष्ण दिगंबर खटावकर | १५-८-१९१५ | ९-९-१९४२ | पुसेसावळी | खटाव |
| ३ हुतात्मा आनंदा श्रीपती गायकवाड | १५-७-१९२१ | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |
| ४ हुतात्मा परशुराम श्रीपती घार्गे | २०-१०-१९०१ | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |
| ५ हुतात्मा सिधु भिवा पवार | १५-७-१९०२ | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |
| ६ हुतात्मा किसन बाळा भोसले | १९२२ | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |
| ७ हुतात्मा खाशाबा मारुती शिंदे | १९१७ | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |
| ८ हुतात्मा श्रीरंग भाऊ शिंदे | १८९८ | ९-९-१९४२ | उंचीठाणे | खटाव |
| ९ हुतात्मा रामचंद्र कृष्णा सुतार | १९१० | ९-९-१९४२ | वडगांव | खटाव |

ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्राणाहुती देऊन हौतात्म्य पत्करले.
त्यांच्या आणि अज्ञात हुतात्म्यांच्याही स्मृतीस शतशः प्रणाम.

# हुतात्म्यांची भूमी वडूज

सातारा जिल्ह्यातील खटाव हा दुष्काळी तालुका म्हणून सर्वांना परिचित आहे मात्र या तालुक्यातील काही गावे आपल्या वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्धी झोतात आहेत या तालुक्यातील मुख्य कचेरीचे गाव म्हणून वडूज हे हुतात्म्यांची भूमी म्हणून प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला पण हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी वडूज येथे नऊ स्वातंत्र्य सैनिकांना आपले प्राण अर्पण करावे लागले आहेत.


महात्मा गांधीजींनी इंग्रजांना आदेश दिला भारत छोडोचा आणि सर्वच कायकर्ते मोर्चे बांधू लागले, जिल्ह्यात औंध येथील बॅ. आप्पासाहेब पंत बंडोपंत लोमटे, गौरीहर सिहासने, दादासाहेब साखवळकर, नानासाहेब आयचीत, पिळोबा वडुजकर, रामभाऊ नलवडे, माणिकचंद दोशी बापूराव कचरे यांनी गावोगावी गुप्त बैठका घेऊन ९ सप्टेंबर १९४२ रोजी वडूज येथे मामलेदार कचेरी वर मोर्चा नेवून तिरंगा झेंडा फडकवण्याचा निर्धार केला.

३ सप्टेंबरच्या तासगाव च्या मोर्चामुळे प्रेरणा घेऊन हा मोर्चा यशस्वी करण्याचे ठरवले सुमारे सातशे ते आठशे लोकांचा मोर्चा जयराम स्वामी वडगाव येथून पैलवान परशुराम घारंगे यांच्या नेतृत्वाखाली निघून वडूज येथे ठीक दोन वाजता पोचला, यावेळी 'वंदे मातरम' 'भारत छोडो' च्या घोषणा दिल्या जात होत्या.

यावेळी वडूजचे तत्कालीन मामलेदार अंकली यांनी फौजदार बंडगिरी यांना गोळीबाराचा आदेश दिला क्षणात गोळ्यांचा वर्षाव जमावर सुरू झाला त्यात नऊ कार्यकर्ते हुतात्मे झाले पैलवान परशुराम श्रीपती घाडगे आनंदा श्रीपती गायकवाड सिद्ध भिवा पवार किसन बाळा भोसले, खाशाबा मारुती शिंदे, रामचंद्र कृष्णा सुतार, बलभीम हरी खटावकर, बाळकृष्ण दिगंबर खटावकर, व श्रीरंग भाऊ शिंदे ही त्यांची नावे आहेत, त्यापैकी ५ जण जागेवरच मरण पावली तर ४ जण दवाखान्यात मरण पावले.

या सर्वांचे माण तालुक्यातील दहिवडी येते शवविच्छेदन झाले व तिथे माणगंगातीरी धोंडीराम काशीद व आभूभाई शेख यांनी पुढाकार घेऊन सर्वांचा अंत्यविधी केला,

त्यानंतर वडुजचे स्वातंत्र्यसैनिक गौरीहर सिंहासने, नानासाहेब आयाचीत रामभाऊ नलवडे रामचंद्र गोविंद अंबिके, रामचंद्र जाधव यांनी १९७८ च्या सुमारास एक ट्रस्ट स्थापन करून हुतात्म्यांचे स्मारक उभारण्याचे ठरविले. पुढे १९८५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. अंतुले ९ सप्टेंबर ला वडूज येथे आले त्यांनी ९ सप्टेंबर १९४२ ची कहाणी ऐकली व त्यांनी ९ हुतात्म्यांच्या स्मार काची घोषणा केली व महाराष्ट्रात जिथे जिथे हुतात्मे झाले तिथे तिथे शासनाच्या वतीने स्मारक बांधण्याची घोषणा करून अल्पावधीतच पूर्ण केली



:

संकलन :
**प्रा. अजय शेटे**
हुतात्मा परशुराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वडूज

: शब्दांकन :
**दत्ता इनामदार**
प्रतिनिधी

# बलिदान झालेले हुतात्मे

## बलिदान दि. ९-९-१९४२

| हुतात्म्याचे नाव | गाव |
|---|---|
| परशुराम श्रीपती घार्गे | वडगाव |
| बलभीम हरी खटावकर | पुसेसावळी |
| बाळकृष्ण दिगंबर खटावकर | पुसेसावळी |
| आनंदा श्रीपती गायकवाड | वडगाव |
| सिधु भिवा पवार | वडगाव |
| किसन बाळा भोसले | वडगाव |
| खाशाबा मारूती शिंदे | वडगाव |
| श्रीरंग भाऊ शिंदे | वडगाव |
| रामचंद्र कृष्णा सुतार | उंचीठाणे |
|  | वडगाव |